नि.दि.मु.नं. १३२ /२०१८
ब्रजेश वि. उपअभियंता व इतर.
निशाणी क्र.१३१.

वादी तर्फे साक्षीदार क्र. २
मी शपथेवर कथन करतो की,

माझे नाव : वासुदेव किसनराव तुपसुंदरे,
वय : ६० वर्षे व्यवसाय : सेवानिवृत्त, हुद्‌दा : स्थापत्य अभियांत्रीक सहायक
राहणार : पुसद, ता. पुसद, जि. यवतमाळ.

..................

**साक्षीदाराचा सरतपास वादी तर्फे वकील श्री.जी.के.टिकार यांचे मार्फत :**

१. मी सन २००७ ते २०१३ पर्यंत अकोट पंचायत समितीत स्थापत्य अभियांत्रीक सहायक म्हणुन कार्यरत होतो. मी माझ्या वरीष्ठांच्या सांगण्यावरून दिनांक ०९.१२.०१३ रोजी फेरफार नोंद करण्याचा अर्ज दिला होता. तो अर्ज मी सन २०१३ आलेल्या शासन निर्णयान्वये पंचायत समितीची जागा महसुल सदरी नोंद करण्याकरीता केला होता. त्याकरीता मी दिनांक १०.१२.२०१३ रोजीचा माझा प्रतिज्ञालेख दिला होता. आता मला निशाणी १०९ या कागदपत्राच्या यादीसोबत अ.क्र. १ व २ ला दाखल असलेली माझ्या फेरफार नोंद करण्याच्या अर्जाची व त्यासोबत दिलेल्या प्रतिज्ञापत्राची सत्यप्रत दाखविण्यात आल्या. त्यातील मजकुर बरोबर आहे. त्यावर माझ्या सहया आहेत. त्यास अनुक्रमे **निशाणी १३२ व १३३** देण्यात येते. हे मला माहित नाही की माझ्या अर्जावरून महसुल दप्तरी नोंद घेण्यात आली.

**सरतपास संपला.**

**उलटतपास प्रतिवादी क्रमांक १ तर्फे वकील श्री.जी.एन.इंगोले यांचे मार्फत :**

२. निशाणी १३२ व १३३ महसुल दप्तरी दाखल करण्याबाबत मला माझ्या वरीष्ठांनी कोणताही लेखी आदेश दिला नव्हता. मी निशाणी १३२ व १३३ मधील नमुद असलेली जागा ही पंचायत समितीच्या नावे आहे याची खात्री करण्याकरीता त्या जागेची आखीव पत्रीका बघितली नाही. हे म्हणणे खरे नाही की मी निशाणी १३२ व १३३ हे चुकीचे कागदपत्रे दाखल केली आहेत. हे

म्हणणे खरे नाही की मी खोटी साक्ष देत आहे.

**प्रतिवादी क्र. १ तर्फे उलटतपास संपला.**

**३. उलटतपास प्रतिवादी क्रमांक ३ व ५ तर्फे सरकारी वकील श्री. अजित देशमुख यांनी वरीलप्रमाणे प्रतिवादी क्र. १ तर्फे घेण्यात आलेला उलटतपास हा प्रतिवादी क्रमांक ३ व ५ तर्फे उलटतपास म्हणुन स्वीकारत असल्याचे सांगितले.**

**४. प्रतिवादी क्र. २ तर्फे उपअभियंता सार्वजनिक बांधकाम श्री सुलताने व प्रतिवादी क्र. ४ कार्यकारी अभियंता तर्फे उपअभियंता श्री.पी.पी.इंगळे यांनी वरीलप्रमाणे प्रतिवादी क्र. १ तर्फे घेण्यात आलेला उलटतपास हा प्रतिवादी क्रमांक २ व ४ तर्फे उलटतपास म्हणुन स्वीकारत असल्याचे सांगितले.**

**उलटतपास संपला.**
**फेरतपास नाही.**

माझे समक्ष/श्रवणोत्तर स्विकृत,

स्वा/—

दि. ०९.०६.२०२५.

( महेश एस. काळे )
**दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर, अकोट**